# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड       जा.क्र. 306 / 2022       दिनांक : 09.08.2022

## 1)घरफोडी :–

**1)भाग्यनगर :–** दिनांक 07.08.2022 रोजी चे 19.00 ते दि. 08.08.2022 चे 11.00 वा. चे दरम्यान, **ज्ञानेश्वर नगर नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे घराचे दरवाजाचे कोणीतरी अज्ञात आरोपीतांनी कुलूप तोडुन घरात प्रवेश करून घरातील कपाटात ठेवलेले सोन्याचे दागीने व नगदी 20,000/–रूपये असा एकुण 60,000/–रूपयाचा ऐवज चोरून नेला. वगैरे **फिर्यादी सुधीर निवृत्तीराव गऊळकर, वय 46 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. बँक कॉलनी प्लॉट नंबर –21 ज्ञानेश्वर नगर नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरन 274/2022 कलम 457, 380, भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1076 सय्यद, मो.क्रं. 9834849924** हे करीत आहेत.

## 2)मोबाईल चोरी :–

**1)भाग्यनगर** :– दिनांक 08.08.2022 रोजी चे 15.00 वा. चे सुमारास, **भक्ती लॉन्स मालेगाव रोड नांदेड येथे,** यातील फिर्यादी व त्याचा साथीदार असे मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांची सभा ऐकणे व पाहाणे करीता गेले असता कोणीतरी अज्ञात चोरटयांने त्यांचे खिशातील सॅमसंग कंपणीचा मॉडल नंबर सी–9 प्रो मोबाईल किंमती 15,000/–रूपयाचा व साथीदार कुंडलीक देवराव शेळके, यांचा रिअलमी कंपाणीचा मोबाईल किंमती 14,000/–रूपयाचा असे एकुण दोन मोबाईल किंमती 29,000/–रूपयाचे चोरून नेले. वगैरे **फिर्यादी मंगेश प्रल्हादराव भरकड, वय 33 वर्षे, व्यवसाय शेती रा. लक्ष्मीनगर जुना पेडगाव रोड परभणी जि. परभणी** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरन 275/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2309 जाधव, मो.क्रं. 9049343095** हे करीत आहेत.

**2)कंधार** :– दिनांक 08.08.2022 रोजी चे 14.00 वा. चे सुमारास, **महाराणा प्रताप चौक कंधार ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा भाजीपाला खरेदी करीत असतांना त्याचे शर्टचे छातीवरील खिशातील रिअलमी कंपाणीचा मोबाईल किंमती 12,100/–रूपयाचा कोणीतरी अज्ञात चोरटयांने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी गोविंद पि. रामराव शिंदे, वय 38 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. बारूळ ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कंधार** गुरन 254/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/गणाचार्य, मो.क्रं. 9823391570** हे करीत आहेत.

## 3)जुगार :–

**रामतिर्थ :–** दिनांक 08.08.2022 रोजी चे 22.15 वा. चे सुमारास, **नरसी ते मुखेड रोडवर ईदगाह जवळ नरसी सार्वजनिक ठिकाणी पोलवरील लाईनचे उजेडात ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या तिर्रट नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 5200/–रूपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/2441 प्रल्हाद माणु आडे, ने. पोस्टे रामतिर्थ** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे रामतिर्थ** गुरनं 125/2022 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोहेकॉ/2079 तमलुरे, मो.क्र. 7038032440** हे करीत आहेत.

## 4)गळफास घेवुन मृत्यु :–

**1)कंधार :–**दिनांक 07.08.2022 रोजी चे 11.00 ते 16.00 वा. चे दरम्यान, **कल्लाळी शिवारात ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे अजय अशोक सोनकांबळे, वय 31 वर्षे, रा. कल्लाळी ता. कंधार जि. नांदेड,** यांनी ग्रामीण बँक शाखा पेठवडजचे असलेले पीक कर्ज कसे फेडावे व या वर्षी अतिवृष्टी झाल्याने सततची नापीकीमुळे तणावातुन खबर देणाऱ्याचे शेतातील लिंबाचे झाडाला दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार अशोक पि. गोविंद सोनकांबळे, वय 65 वर्षे, व्यवसाय शेती रा. कल्लाळी ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे कंधार** आ. मृ. **65/2022** कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री लोणीकर, मो.नं. 9422336474** हे करीत आहेत.

**2)बारड** :—दिनांक 07.08.2022 रोजी चे 11.00 ते 18.00 वा. चे दरम्यान, **यातील मयताचे राहाते घरी मौ. सरेगाव ता. मुदखेड जि. नांदेड येथे**, यातील **मयत नामे नागोराव हानुमंता गिरे, वय 30 वर्षे, व्यवसाय शेती रा. सरेगाव ता. मुदखेड जि. नांदेड**, यांनी अतिवृष्टी मुळे शेतातील नापीकी झाल्याने बँकेचे कर्ज परतफेड करणे शक्य नसल्याने तणावातुन घरातील आतल्या खोलीत दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. वगैरे **खबर देणार हानुमंता पुरबाजी गिरे, वय 60 वर्षे, व्यवसाय शेती रा. सरेगाव ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे बारड** आ. मृ. **15**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री तुगावे, मो.नं. 9822179877** हे करीत आहेत.

## 5)विषारी औषध पिवून आत्महत्या :—

**हिमायतनगर** :—दिनांक 07.08.2022 रोजी चे 21.00 ते दि. 08.08.2022 चे 09.30 दरम्यान, **मौ. जवळगाव ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे**, यातील **मयत नामे सुरेश व्यंकोबा माने, वय 44 वर्षे, व्यवसाय शेती रा. जवळगाव ता. हिमायतनगर जि. नांदेड**, यांनी त्यांच्या शेतात मागील तीन वर्षापासुन नापिकी झाली. या वर्षी पण अतिवृष्टी झाल्याने शेतात पेरलेले सोयाबीन, कापसाचे पिक चिमडुन गेले व शेतातील अर्धे पिक पाऊसाच्या पुराने पाण्यात वाहुन गेले आता बँकेचे कर्ज कसे फेडाव या तणावास कंटाळुन गोठयात कोणतेतरी विषारी औषध पिऊन आत्महत्या केला. वगैरे **खबर देणार शिवाजी सिताराम माने, वय 34 वर्षे, व्यवसाय शेती रा. जवळगा ता. हिमायतनगर जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे हिमायतनगर आ. मृ. 26/2022** कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1893 पोटे, मो.नं. 9067901830** हे करीत आहेत.

## 6)जळुन मृत्यु :—

**देगलुर** :—दिनांक 05.08.2022 रोजी चे 06.30 ते 19.30 वा. चे दरम्यान, **सरकारी दवाखाना विष्णुपूरी ता. जि. नांदेड येथे**, यातील **मयत नामे 1)कपिल सुर्येकांत सक्रपा, वय 22 वर्षे, 2.सुर्येकांत माधवराव सक्रपा, वय 52 वर्षे, 3.गंगुबाई सुर्येकांत सक्रपा, वय 50 वर्षे, सर्व रा. बल्लुर ता. देगलुर जि. नांदेड**, यातील खबर देणार यांचे वडील पिचकारी मध्ये पेट्रोल टाकत असतांना वडील तोंडातील ओडत असलेली बिडी पेट्रोलवर पडल्याने भडका होवुन यातील मयत हे गंभीर जळाल्याने त्या सर्वाना सरकारी दवाखाना विष्णुपूरी येथे ॲडमीट केले असता उपचारा दरम्यान वरील तिघेही जळुन मरण पावले आहे. वगैरे **खबर देणार श्वाती सुर्येकांत सक्रपा, वय 24 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. बल्लुर ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे देगलुर** आ. मृ. **22**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास मपोउपनि/सुर्यवंशी मॅडम, मो.नं. 9821159844** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड